# थोडक्यात

## उद्या पासून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : शिक्षण निरीक्षक बृहन्मुंबई पश्चिम विभाग, माध्य. व उच्चमाध्यमिक शाळा (पश्चिम विभाग) आणि जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन समिती यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार ७ जानेवारी ते ९ जानेवारी या काळात जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. 'समावेशित विकासासाठी विज्ञान व गणित' या विषयावर आधारीत प्रदर्शनाचे उद्घाटन केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री मुख्तार अब्बास नक्वी गुरूवारी सकाळी ९ वाजता चिल्ड्रेन वेल्फेअर सेंटर हायस्कूल, यारी रोड, वर्सोवा येथे करतील. यावेळी राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे, आमदार विनायक मेटे, डॉ. भारती लव्हेकर, कपिल पाटील, मुंबई विभागीय मंडळाचे अध्यक्ष, नेहरू तारांगणाचे संचालक अरविंद परांजपे, मुंबई विभागाचे शिक्षण उपसंचालक बी. बी. चव्हाण उपस्थित राहणार आहेत. प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी २.३० वाजता गुणगौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. गृहनिर्माण, कामगार आणि खाण मंत्री प्रकाश मेहता हे या समारंभाचे प्रमुख अतिथी असून सिने अभिनेता जॅकी श्रॉफ, सिने अभिनेत्री झनत अमान व चिल्ड्रेन वेल्फेअर सेंटरच्या अध्यक्षा शबनम कपूर या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ९ जानेवारी रोजी दुपारी २.३० वाजता या विद्यान प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण व समारोप समारंभ चिल्ड्रेन वेल्फेअर सेंटर हायस्कूल येथे नागालँड, आसामचे राज्पाल पी.बी. आचार्य, खासदार गोपाळ शेट्टी, आमदर योगेश सागर, मुंबई महापालिकेचे स्थायी समिती अध्यक्ष शैलेश (यशोधर) फणसे, महापालिका विरोधी पक्षनेते देवेंद्र (बाळा) आंबेकर यांच्या उपस्थितीत होणार आहे.

## स्वच्छ महाराष्ट्र अभियान सोशल मीडियावर

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : स्वच्छ महाराष्ट्र अभियान हे आता अभियान न राहता लोकचळवळ झाली आहे. आपण सर्व एकत्रित येऊया आणि महाराष्ट्र स्वच्छ करुया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या ट्विटर आणि फेसबुक पेजचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मंत्रालयात करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा म्हैसकर उपस्थित होत्या. यावेळी बोलताना मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारत साकार करण्यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेतला आहे. राज्यातील १९ शहरे संपूर्ण हागणदारी मुक्त झाली असून अजून ३० शहरांची वाटचाल हागणदारी मुक्तीकडे सुरु आहे. पंतप्रधानांचे स्वप्न साकार करण्यासाठी आपण सगळे हातात हात घालून एकत्रित येऊया आणि आपला देश, आपले राज्य स्वच्छ करुया, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे ट्विटर twitter.com/SwachhMaha आणि www.facebook.com/SwachhMaha या पेजचा प्रारंभ करण्यात आला.

## मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या तक्रार निवारणासाठी आज लोकअदालत

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : मुंबई विभागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या वाढत्या तक्रारी विचारात घेता येत्या ६ जानेवारी रोजी गृहनिर्माण संस्थांची लोकअदालत सहकार राज्यमंत्री दादाजी भुसे घेणार आहेत. ही लोकअदालत सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत, विभागीय सहनिबंधक कार्यालय, मल्होत्रा हाऊस, सहावा मजला, जीपीओसमोर येथे होणार आहे. या लोकअदालतीमध्ये गृहनिर्माण संस्थांच्या तक्रारी, मानिव अभिहस्तांरणाबाबतच्या तक्रारी, सहकार विभागाच्या जिल्हा व वॉर्डस्तरीय कार्यालयांकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, त्यावरील कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येणार आहे. यापूर्वी तक्रार नोंदवहीत नोंदविलेल्या तक्रारींबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा जिल्हा उपनिबंधकाच्या त्याच दिवशी होणाऱ्या बैठकीत घेण्यात येईल. या लोकअदालतीसाठी तक्रारदारांसह मुंबई विभागातील सहनिबंधक व जिल्हा उपनिबंधक हे उपस्थित राहणार असून मुंबईतील सहकारी गृहनिर्माण संस्थांनी तक्रारी असल्यास लेखी स्वरुपात दाखल कराव्यात आवाहन करण्यात आले आहे.

## आज श्रमिक पत्रकारांची कार्यशाळा

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : भारतीय पत्रकार संघ आणि केंद्रीय श्रमिक शिक्षण बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसांची श्रमिक पत्रकारांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. केंद्रीय श्रमिक शिक्षण बोर्ड संकुल, कुर्ला कोर्टालगत, एलबीएस रोड, कुर्ला पश्चिम येथे सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत होणाऱ्या या कार्यशाळेचे उद्घाटन केंद्रीय श्रमिक शिक्षण बोर्डचे अध्यक्ष लक्षुमा रेड्डी हे करणार आहेत. यावेळी भारतीय पत्रकार संघाचे अध्यक्ष अण्णासाहेब देसाई उपस्थित राहणार आहेत.

## पत्रकारिता व तणावमुक्ती या विषयावर मंत्रालयात आज व्याख्यान

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या, दिनांक ६ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता मंत्रालयातील चित्रपट परीक्षणगृह येथे पत्रकारिता व तणावमुक्ती या विषयावर पुणे येथील अशोक देशमुख यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. व्याख्यानासाठी पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष चंदन शिरवाळे आणि महासंचालक चंद्रशेखर ओक यांनी केले आहे.

## राज्य वाङ्मय पुरस्कारासाठी ५ फेब्रुवारीपर्यंत प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०१५ करिता राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठी प्रवेशिका तसेच पुस्तके पाठविण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने केले आहे. याबाबतचे अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात ५ फेब्रुवारी २०१६ पर्यंत उपलब्ध असतील असे मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे. दिनांक १ जानेवारी, २०१५ ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. मुंबईतील लेखक/प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ येथे पाठवाव्यात.

## नवलेखक अनुदान योजनेबाबत साहित्य संस्कृती मंडळाचे आवाहन

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून सन २०१६ या वर्षासाठी ज्याचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांच्या पहिल्या प्रकाशनाला अनुदान देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. नवलेखकांना कविता, नाटक, एकांकिका, बालवाङमय (६४ ते ९६ टाईप केलेली पृष्ठे), कथा, कादंबरी, ललितलेख, चरित्र, आत्मकथन, प्रवास वर्णन (१२८ ते १४४ टाईप केलेली पृष्ठे) या सहा वाङमय प्रकारातील पहिल्या प्रकाशनासाठी वरील पृष्ठसंख्येच्या मर्यादेतील मुद्रित (टाईप) मजकुराला अनुदान देण्यात येणार आहे. नवलेखकांनी त्यांचे साहित्य ३१ जानेवारी पर्यंत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड, प्रभादेवी या पत्त्यावर पाठवावे. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२२-२४३२५९३९ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेसाठीचे माहितीपत्रक, अर्ज आणि इतर तपशील मंडळाच्या msblc.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.




'वीज दरवाढीची आणखी शक्यता आहे काय?' या विषयावर इंडियन मर्चंटस चेंबरमध्ये मंगळवारी सायंकाळी एक अभ्यासपूर्ण चर्चासत्र झाले. फ्री प्रेस जर्नल आणि इंडियन मर्चंटस चेंबर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या चर्चासत्राच्यावेळी टिपलेल्या छायाचित्रात (डावीकडून) टाटा पॉवरचे व्यवस्थापकीय संचालक अनिल सारडाना, इंडियन मर्चंटस चेंबरचे उपाध्यक्ष दीपक प्रेमनारायण, इंडियन मर्चंटस चेंबरचे अध्यक्ष दिलीप पिरामल, केंद्रीय ऊर्जा नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष प्रमोद देव, फ्री प्रेस जर्नलचे सल्लागार संपादक आर. एन. भास्कर, राज्याचे प्रधान सचिव (ऊर्जा) मुकेश खुल्लर, जे. एम. फायनान्सचे कार्यकारी संचालक सुहास हरिनारायण, महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक बिपीन श्रीमाळी दिसत आहेत. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. (छाया: बी. एल. सोनी)

## पत्रकार दिनाचा आज कार्यक्रम

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : मुंबई मराठी पत्रकार संघातर्फे उद्या ६ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता पत्रकार भवन येथे पत्रकार दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या समारंभासाठी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ पत्रकार सुरेश द्वादशीवार उपस्थित राहणार आहेत. तसेच या समारंभात पत्रकार संघातर्फे दिले जाणारे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

## पोलीस हवालदाराचा मृत्यू

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - माटुंग्यातील अपघातील नितीन श्रीधर परब या पोलीस हवालदाराचा आज पहाटे उपचार सुरु असतानाच शीव रुग्णालयात मृत्यू झाला. तीन दिवसांपूर्वी अपघातात नितीन परब हे गंभीररीत्या जखमी झाले होते, त्यांच्यावर शीव रुग्णालयात उपचार सुरु होते, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# दुष्काळात जनावरांचा सांभाळ करण्यासाठी जैन समाजाने पुढाकार घ्यावा - मुख्यमंत्री

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : राज्यात आज मोठ्या प्रमाणावर दुष्काळ आहे. विशेषत: मराठवाड्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे. दुष्काळामुळे जनावरांचे अतोनात हाल होत असून जनावरांचा सांभाळ करणे ही सर्वांची प्राथमिकता असणे आवश्यक आहे. जैन समाजानेही दुष्काळात जनावरांचा सांभाळ करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.




सायन येथील सोमय्या मैदान येथे साहित्य सत्कार सोहळा यात्रा ३००' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आचार्य भगवंत श्रीमद विजय रत्नसुंदरसूरीश्वरजी म.सा. यांच्या ३०० व्या पुस्तकासह ५ पुस्तकांचे प्रकाशन आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, आचार्य भगवंत श्रीमद विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी यांना आपण पहिल्यांदा औरंगाबादमध्ये भेटलो होतो. तेव्हा आपण त्यांना महाराष्ट्रात गोवंश हत्या बंदी कायदा लागू करण्यात येणार असल्याचे सांगितले होते. त्यांना शब्द दिल्यानंतर राज्य शासनाने पहिल्या महिन्यातच राज्यात गोवंश हत्या बंदी लागू केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले

या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे तसेच विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी यांचे आशीर्वाद घेण्याचे भाग्य मला मिळाले, याबद्दल मी अत्यंत आनंदित आहे. विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी यांनी जीवन कसे जगावे याचा बहुमूल्य संदेश दिला आहे. या संदेशाचे आपण अनुकरण केले तर आपण नक्कीच सुखी होऊ, असे मला वाटते. विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी यांनी आतापर्यंत आपल्या वाणीने युवकांना जीवन कसे जगावे यासाठी प्रेरित केले आहे. त्यांच्या विचारांनी अनेकांना जगण्याची प्रेरणा मिळते. विजय रत्नसुंदरसुरीश्वरजी यांनी केवळ धर्माचीच नाही तर मानवतेची आणि देशाची सेवा केली आहे. म्हणूनच रत्नसुंदरसुरीश्वरजी हे राष्ट्रीय संत आहेत, असेही ते म्हणाले.

रत्नसुंदरसुरीश्वरजी यांनी भौतिक सुखाच्या पुढे जाऊन जीवनात आपल्याला उच्चतम मूल्य कसे मिळेल याचे सखोल मार्गदर्शन केले आहे. त्यांच्यामुळे आपल्याला मिळणारी आध्यात्मिक शक्ती महत्त्वाची असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

## मनपा बोगस नोकरी भरतीप्रकरणी तिसऱ्या आरोपीस अटक

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) - महापालिकेतील नोकरी भरतीप्रकरणातील भ्रष्टाचाराची पाळेमुळे अधिक खोल असल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी तिसऱ्या आरोपीस काल गुन्हे प्रकटीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. गणेश राजाराम जाधव असे या आरोपीचे नाव असून याच गुन्ह्यांत त्याला येथील स्थानिक न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

महानगरपालिकेच्या डी वार्डात बोगस कागदपत्रांच्या आधारे काही बोगस उमेदवारांची नोकरी भरती करण्यात आल्याचे उघडकीस येताच नोव्हेंबर महिन्यांत गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. याच गुन्ह्यांत आतापर्यंत पोलिसांनी अकरा आरोपींना अटक केली होती. त्यात गणेश जाधव याचाही समावेश होता.

या गुन्ह्यांचा तपास सुरु असताना जी साऊथ विभागात अशाच प्रकारे



बोगस नोकरी भरती झाल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे १ जानेवारीला गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी दुसऱ्या फसवणुकीच्या गुन्ह्यांची नोंद केली होती. याच गुन्ह्यांत तीन दिवसांपूर्वी रमेश भिका राठोड आणि प्रशील दयानंद वाघमारे या दोघांना अटक केली. सध्या ते दोघेही पोलीस कोठडीत आहेत. त्यांच्या चौकशीतून गणेश जाधव याचे नाव समोर आले होते. त्याला त्याला याच गुन्ह्यांत काल पोलिसांनी अटक केली.

## घाटला गाव पोटनिवडणुकीत काँग्रेसला राष्ट्रवादीचा पाठिंबा



शिवसेनेचाही प्रचार शिगेला

मुंबई, मंगळवार (प्रतिनिधी) : घाटला गाव पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवाराला विजयी करण्यासाठी राष्ट्रवादीने काँग्रेसला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे.

मुंबई महापालिका प्रभाग क्रमांक १४७ पोट निवडणूक रविवार १० जानेवारी रोजी होणार आहे. यानिवडणुकीत काँग्रेसने राजू नगराळे यांना उमेदवारी दिली आहे. तर शिवसेनेकडून अनिल पाटणकर यांना अधिकृत उमेदवारी दिली आहे. या वॉर्डातून काँग्रेसच्या तिकिटावर विजयी झालेल्या नगरसेवक अनिल पाटणकर यांनी चार महिन्यांपूर्वी सदस्यत्वाचा राजीनामा देत शिवसेनेमध्ये प्रवेश केला. त्यामुळे प्रभाग प्रभाग क्र. १४७ मध्ये पोटनिवडणूक होत आहे. शनिवारी नगराळे यांच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन मुंबई काँग्रेस अध्यक्ष संजय निरुपम यांच्या हस्ते झाले. या वेळी मुंबई विभागीय राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सचिन अहिर उपस्थित होते.

## महापौर आयोजित 'माझी मुंबई' बालचित्रकला स्पर्धा येत्या रविवारी

मुंबई, मंगळवार (वृत्तसंस्था) : बृहन्मुंबई महानगरपालिकेच्यावतीने महापौर आयोजित जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती उत्सवानिमित्त बाल चित्रकला स्पर्धा येत्या रविवारी, १० जानेवारी रोजी सकाळी ८.३० ते ११.३० दरम्यान बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सुमारे ३९ उद्यान व मैदानांत आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील अनुदानित - विना अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर स्नेहल आंबेकर यांनी केले आहे. स्पर्धेतील विजेत्या मुलांचे छायाचित्र मुंबई क्षेत्रातील होर्डिंग्जवर झळकविण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे बालचित्रकला स्पर्धा मागील ५ वर्षांपासून आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत एक लाखापेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. स्पर्धेची व्याप्ती लक्षात घेता, महापौरांनी काल (०४ जानेवारी ) सकाळी महापौर निवास, दादर येथे बृहन्मुंबई क्षेत्रातील अनुदानित - विना अनुदानित शाळेतील मुख्याध्यापकांची बैठक आयोजित केली होती. या बैठकीस सुमारे ८०० मुख्याध्यापक उपस्थित होते. बैठकीस शिक्षण समितीच्या अध्यक्षा रितू तावडे, उप शिक्षणाधिकारी प्रकाश चरहाटे, डॉ. जीवबा केळुसकर, सर्व मुख्याध्यापक, प्रशासकीय अधिकारी (शाळा) हे मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

पुढे महापौर म्हणाल्या की, जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महापौर आयोजित माझी मुंबई या विषयावर बालचित्रकला स्पर्धा सन २०१५-१६ चे आयोजन येत्या रविवारी होत आहे. ही स्पर्धा बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्व अनुदानित - विना अनुदानित शाळेतील इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. स्पर्धेच्या अनुषंगाने माहिती पुस्तिका सर्व मुख्याध्यापकांना पोहोचविण्यात आली आहे. तीन गटात होणाऱ्या या स्पर्धेतील विद्यार्थ्यांसाठी विषय निश्चित करुन देण्यात आला आहे. सन सन २०१४-१५ वर्षी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेप्रसंगी मी अनेक चित्रकला स्पर्धेठिकाणी भेट दिली होती. जेव्हा उत्तमप्रकारे नियोजन केले होते. यावर्षीही अशाच स्वरुपाचे नियोजन करावे, असेही महापौरांनी सांगितले.

महाराष्ट्र शासन



वारसा बाळशास्त्री जांभेकरांचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा
संस्मरण दर्पणकाराचे

आचार्य बाळशास्त्री जांभेकर(१८१२-१८४६)

पत्रकारांच्या कल्याणासाठी :

- विकास पत्रकारितेला चालना देण्यासाठी आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्यासह विविध महापुरुषांच्या नावे दरवर्षी विविध पुरस्कार देऊन पत्रकारांचा सन्मान.
- पत्रकारितेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या ज्येष्ठ पत्रकार, संपादकांचा लोकमान्य टिळक जीवनगौरव पुरस्काराने गौरव.
- राज्यातील सुमारे अडीच हजार पत्रकारांना अधिस्वीकृतीपत्रिका प्रदान
- अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना गंभीर आजार, अपघात झाल्यास किंवा अकस्मात निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी राज्य शासनाच्या शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधीची स्थापना
- अधिस्वीकृतीपत्रिकाधारक पत्रकारांना राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमध्ये तसेच रेल्वेमध्ये प्रवासासाठी सवलत.
- अधिस्वीकृतीपत्रिकाधारक पत्रकारांना शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत औषधोपचार.

दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन...

दर्पणदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !

देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

डीजीआयपीआर २०१५-१६/३५८८